




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**





● वर्ष : ०१ ● अंक : ३४२ ● पुणे ● सोमवार, दि. २१ ऑक्टोबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




बारामतीतून अजित पवारच लढवणार 3



रवींद्र धंगेकर यांच्या हिंदमाता... 4

# महाविकास आघाडीकडून ‘बापू’ फिक्स

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या पाच वर्षांमध्ये राज्याच्या राजकारणाची पूर्ण खिचडी झाल्याने ही विधानसभा निवडणूक व्यक्ती केंद्रित झाल्याचे पाहायला मिळत आहे. मतदारसंघातील विकासाचे मुद्दे चर्चेच्या केंद्रस्थानी नसून ते थेट दुसऱ्या तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले आहेत. विकासापेक्षा गट-तट आणि व्यक्तीकडे निवडणूक झुकल्याचे दिसत आहे. यामध्ये शिरूर-हवेली मतदारसंघ देखील अपवाद नाही.

शिरूर-हवेलीमधून विद्यमान आमदार अशोक पवार हेच महाविकास आघाडीचे उमेदवार असणार, हे निश्चित आहे. परंतु, महाविकास आघाडीचा प्रमुख प्रतिस्पर्धी असलेल्या महायुतीमधून उमेदवारी नक्की कोणाला मिळणार? याकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागून राहिले आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीची घोषणा मंगळवार 15 ऑक्टोबर रोजी झाली. 22 ऑक्टोबरला निवडणुकीची अधिसूचना निघाल्यानंतर खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष रणधुमाळीला सुरूवात होणार आहे.



त्यानुसार शिरूर – हवेली विधानसभा मतदारसंघांतही राजकीय घडामोडींनी देखील वेग घेतला आहे. 2019 आणि 2024 च्या राजकीय परिस्थितीमध्ये खूप मोठे बदल झालेले आहेत. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन प्रमुख प्रादेशिक पक्षांमध्ये फुट पडल्यानंतर कोण कोणत्या पक्षात आहे? याबाबत असलेली साशंकता आजपर्यंत देखील दूर झालेली दिसत नाही. त्यामुळे शिरूर-हवेली विधानसभेचे चित्र कसे असणार, याबाबत मतदारांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या मतसंघात कोण कोणाच्या विरोधात आणि कोणत्या पक्षाकडून लढणार? मैदान कोण मारणार आणि छुपे रूस्तम कोण? याची उत्सुकता मतदारांमध्ये आहे.





विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी आणि महायुती समोरासमोर उभे ठाकणार असले, तरी दोघांना यंदाची निवडणूक सोपी नसणार आहे. शिरूर व हवेलीमध्ये निवडणूक लढवणारा उमेदवार हा आपल्या भागातीलच उमेदवार असावा, यासाठी सोशल मिडीयावर जोरदार प्रचार मोहीम उघडण्यात आली आहे. सध्याच्या अस्थिर राजकारणाच्या काळात काहीही घडू शकते, याची शक्यता अजिबात नाकारता येत नाही. यामुळे अनेकांना ऐनवेळी बदल होऊ शकतो अशी आशा आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी-शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार अशोक पवार यांच्या समोर महायुतीने मोठे आव्हान उभे केल्याने त्यांना धोका निर्माण झाल्याचे वातावरण तयार झाले होते. मात्र, शिरूर – हवेली विधानसभा निवडणुकीसंदर्भात महायुतीमध्ये मोठा पेच निर्माण झाल्याने त्यांच्याकडून सक्षम दावेदार कोण, असा प्रश्न उभा राहिल्याचे चित्र आहे. त्याचवेळी आमदार अशोक पवार यांची उमेदवारी पक्की असल्याने त्यांनी विरोधी उमेदवार कोण असणार? याची वाट न बघता प्रचाराला सुरूवात केली आहे.

दरम्यान, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर उर्फ माऊली (आबा) कटके हे विधानसभा निवडणुकीसाठी तयार असून ते कोणत्या पक्षांकडून की अपक्ष म्हणून मैदानात उतरणार, हे अद्याप समोर आलेले नाही. या निवडणुकीत ते काय निर्णय घेणार? याची उत्सुकता देखील शिगेला पोहोचली आहे. दरम्यान महायुतीकडून आपल्यालाच उमेदवारी मिळेल, या विश्वासाने माऊली आबा जोमाने कामाला लागल्याचे पाहायला मिळत आहे. कटके हे सातत्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रचार करून सर्वसामान्य मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

## आयात उमेदवार नको, पक्षातील निष्ठावंत

नुकतीच शिरूर-हवेली विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची एक बैठक पार पडली. या बैठकीत पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांनाच उमेदवारी द्यावी, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. काही झाले, तरी अन्य पक्षातील इच्छुक उमेदवार आयात करू नये, असे पत्र देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सदर पदाधिकाऱ्यांकडून देण्यात येणार आहे. पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेनंतर अजित दादा काय निर्णय घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ठळक बातम्या

### पुरंदरच्या तहसीलदारांना हटवले

**सासवड : (आरंभ पर्व)**

भारत निवडणूक आयोग यांनी मुख्य निवडणूक अधिकारी पुरंदर, विधानसभा मतदारसंघाकरिता अधिसूचित असलेल्या तहसीलदार पदावर कार्यरत असलेले विक्रम रजपुत यांना निवडणुकीच्या कामकाजापासून अलिप्त ठेवण्याचे व त्यांच्या जागी पुणे महानगरचे तहसीलदार सचिन म्हस्के यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे आदेश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले आहेत.

# केंद्रीय मंत्री थेट राज ठाकरेंच्या भेटीला

*पुण्यातील राजकीय समीकरणे बदलणार? काय घडतंय पडद्याआड?*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांची तयारी पूर्ण झाली आहे. विधानसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीत प्रमुख लढत होणार आहे. परंतु राज ठाकरे यांचा मनसे पक्षही महत्वाचा ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिला होता. परंतु विधानसभा निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय राज ठाकरे यांनी घेतला. त्यांनी मनसेच्या



काही उमेदवारांची घोषणासुद्धा केली आहे. तसेच राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे या निवडणूक रिंगणात उमेदवार म्हणून उतरणार असल्याची शक्यता आहे. यामुळे महायुतीकडून राज ठाकरे यांचे मन वळण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याचवेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहळ राज ठाकरे यांच्या भेटीला शिवतीर्थवर दाखल झाले आहेत. आता या भेटीत काय ठरणार? त्यानंतर राज्यातील राजकीय समीकरणे बदलणार का? हा प्रश्न आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे आणि मुरलीधर मोहळ यांच्यात चर्चा होण्याची शक्यता आहे. मनसेचे पुण्यातील 10 नेते ही शिवतीर्थवर दाखल झाले आहेत. त्यात मनसेचे दोन शहरप्रमुख, 6 राज्य सरचिटणीस, 2 प्रवक्ते यांचा समावेश आहे. पुणे जिल्ह्यातील 13 आणि शहरातील 8 अशा 21 विधानसभा मतदारसंघाचा राज ठाकरे आढावा घेणार असल्याचे माहिती आहे. मुरलीधर मोहळ यांच्या राज ठाकरे यांच्याशी होणाऱ्या भेटीनंतर पुण्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. पुणे शहर किंवा जिल्ह्यातील काही जागांवर राज ठाकरे महायुतीला पाठिंबा देतात का? भाजप मनसेला काही जागा देणार का? या सर्व गोष्टींवर या बैठकीत चर्चा होणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.






# काँग्रेसच्या इच्छुकात नाराजी

## ‘पूर्व’ मतदारसंघात उमेदवारी मिळवण्यासाठी रस्सीखेच



**छ. संभाजीनगर (दै. आरंभ पर्व)**

शहरातील तीनपैकी ‘मध्य’ आणि ‘पश्चिम’ या मतदारसंघात गेल्या वेळी शिवसेनेने विजय मिळवला होता. महाविकास आघाडीमध्ये हे दोन्ही मतदारसंघ उद्धवसेनेकडे आणि ‘पूर्व’ मतदारसंघ काँग्रेसकडे जाण्याची शक्यता आहे. पश्चिम व मध्य मतदारसंघावरून काँग्रेसच्या इच्छुकांमध्ये तीव्र नाराजी आहे. पूर्व मतदारसंघातील उमेदवारीसाठी काँग्रेसचे पदाधिकारी मुंबई व दिल्लीत ठाण मांडून बसले आहेत.

दरम्यान, ‘पश्चिम’ मतदारसंघावरून काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व इच्छुक जितेंद्र देहाडे यांनी पक्षावर टीका केली आहे. काँग्रेसला मागासवर्गीय समाजाची मते हवी असतात, मात्र या समाजाला पक्ष किती जागा देणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

काँग्रेसने पूर्व मतदारसंघात मुस्लिम उमेदवार द्यावा, यासाठी इच्छुकांची मुंबईत अल्पसंख्याक नेत्यांसोबत बैठक झाली, असे अल्पसंख्याक आघाडीचे विभाग अध्यक्ष हमद चाऊस यांनी सांगितले.

महिलांना उमेदवारीसाठी महिला काँग्रेसचे शिष्टमंडळ दिल्लीत ठाण मांडून आहे. या शिष्टमंडळात ‘पूर्वमधून इच्छुक दीपाली मिसाळदेखील आहेत.

जागा घोषित होत नाही तोपर्यंत तिन्ही जागा लढण्याची तयारी करत आहोत. पक्षाने निर्णय घेतल्यानंतर काय करायचे ते ठरवले जाईल, असे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष युसूफ शेख यांनी सांगितले.

‘पश्चिम’ आणि ‘मध्य’ या जागांवर लढण्यासाठी तयारी करण्याचे आम्ही पक्षाच्या पातळीवर दोन्ही उमेदवारांना सांगितले आहे. शिवसेनेत पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर घेतलेला निर्णय अंतिम असतो. त्यामुळे पक्षात कोणी इच्छुक असले तरी पक्षात बंडखोरी होणार नाही, असे उद्धवसेनेचे जिल्हाप्रमुख किशनचंद तनवाणी यांनी सांगितले.

## पुरंदर-हवेलीची जागा भाजपला मिळणार

पुरंदर-हवेली विधानसभा चे प्रश्न सुटले पाहिजेत या भागातील प्रश्न सोडवण्यासाठी भाजपाचे सर्व कार्यकर्ते सातत्याने प्रयत्न करीत असतात हे प्रश्न सोडवण्यासाठी भाजपाचा आमदार असणे गरजेचे आहे. यासाठीच पुरंदरच्या जागेची मागणी पक्षश्रेष्ठींकडे केली असून ही जागा भाजपाला मिळणार आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन प्रचार करणे गरजेचे असल्याचे मत कृषी शिक्षण संशोधन परिषदेचे अध्यक्ष तथा पुणे जिल्हा अध्यक्ष वासुदेव काळे यांनी सांगितले. सासवड येथील आचार्य अत्रे सभागृहामध्ये निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वासुदेव काळे बोलत होते. यावेळी भाजपाचे नेते व समन्वय समितीचे अध्यक्ष बाबाराजे जाधवराव, भाजप पुरंदर तालुका अध्यक्ष निलेश जगताप, शेखर वाढणे, संतोष जगताप, मंगल पवार, सचिन लंबाते, अजिंक्य टेकवडे श्रीकांत ताम्हाणे, राहुल शेवाळे, सोमनाथ कणसे, स्नेहल दगडे, संदीप देवकर, संदीप हरपळे आदी उपस्थित होते. वासुदेव काळे म्हणाले की, पक्षाकडे उमेदवारी माघताना इलेक्टीव मेरिटवर जागा मागितली पाहिजे. सर्व पक्षांचा सर्व्हे करण्यात यावा यानंतर ज्याची जास्त ताकद आहे त्यालाच पुरंदर-हवेलीची जागा मिळावी अशी मागणी मुंबई येथील बैठकीमध्ये करण्यात आली आहे. निवडणुका आल्या की गुंजवणीचे पाणी विमानतळ राष्ट्रीय बाजार यासारखे मुद्दे पुढे केले जातात व गुंजवणीचे भूमिपूजन नारळ फोडणे असे कार्यक्रम केले जातात पुरंदर मधील हे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी भाजपाचा आमदार असणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या माध्यमातून अनेक प्रश्न सोडवण्याचे काम भाजपाकडून करण्यात आली आहे. पुरंदर तालुक्यातील आमदार हा कमळाच्या चिन्हावर निवडून येणे गरजेचे आहे.






# गुजरातमधल्या उद्योगांचा ओघ महाराष्ट्राकडे!

*आता गंगा उलटी वाहू लागली आहे. महाराष्ट्रातले उद्योग गुजरातला पळवले जात असल्याचा गैरसमज निर्माण करणाऱ्या विरोधकांना चांगलीच चपराक बसली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे आखलेल्या ऊर्जा धोरणाचा परिणाम आता दिसू लागला आहे. विजेचे दर परवडत नाहीत; म्हणून गुजरातच्या सूरत आणि दक्षिण गुजरातमधील अनेक कापड उद्योग महाराष्ट्रातल्या नवापूर आणि नंदुरबार येथे स्थलांतरीत होत आहेत.*

कापड उद्योग जगतातल्या माहितीनुसार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नवापूर औद्योगिक नगरीमध्ये सूरतमधल्या उद्योगपतींच्या मालकीचे 130 कापड कारखाने आले आहेत. आणखी दोन डझनहून जास्त उद्योजक सूरतपासून अवघ्या 100 किलोमीटर अंतरावर असलेल्या नवापूरला येण्यास उत्सुक आहेत. नवापूरपासून 60 किलोमीटर अंतरावर असलेल्या नंदुरबारमधील भालेर एमआयडीसीही अनेकांच्या पसंतीला उतरत आहे. सूरतमधल्या कापड उद्योगांना मिळणारी वीज प्रतियुनिट साडेआठ रुपये दराने मिळत आहे. याउलट महाराष्ट्र सरकारच्या अनुदानामुळे महाराष्ट्रात हा दर तीन ते साडेपाच रुपये प्रतियुनिट आहे. याव्यतिरिक्त, सूरतच्या तुलनेत नवापूरमधल्या जमिनी स्वस्त आहेत आणि महाराष्ट्रात करही कमी आहेत. गुजरातचे मागचे वस्त्रोद्योग धोरण गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये संपल्यानंतर गुजरातमधल्या उद्योजकांनी महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योग धोरणावर लक्ष केंद्रीत केले. तब्बल 10 महिन्यानंतर गुजरात सरकारने नुकतेच नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले. मात्र अद्याप त्याचा संपूर्ण मसुदा वेबसाइटवर अपलोड केलेला नाही. वेबसाइटवर फक्त माहितीपत्रक प्रकाशित करण्यात आले आहे. महाविकास आघाडीच्या काळात महाराष्ट्रात येऊ घातलेले काही उद्योग तेव्हाच्या सरकारच्या निष्क्रीयतेमुळे इतर राज्यात गेले. मात्र याचे खापर त्यांनी राज्यातल्या सत्ताधारी महायुती सरकारवर फोडण्याचा प्रयत्न केला. तेव्हाच परराज्यातले उद्योग महाराष्ट्रात परत आणण्याचे स्थगित ठेवण्यात आलेले धोरण सरकारने पुन्हा स्वीकारले. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी याकरीता विशेष पुढाकार घेतला. त्याचे फळ आता मिळू लागले आहे, अशी भावना उद्योग जगतात व्यक्त होत आहे.



देशातल्या परकीय गुंतवणुकीतही महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे. एप्रिल ते जून 2024 या चालू आर्थिक वर्षातल्या पहिल्या तीन महिन्यांतच जी आकडेवारी समोर आली त्यामध्ये देशात झालेल्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी तब्बल 52.46% गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. गेली दोन वर्षे सातत्याने परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर राहिला आहे. 2024-2025, या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत महाराष्ट्रात 69 हजार 795 कोटींची परकीय गुंतवणूक आली. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या कर्नाटकमध्ये 19 हजार 59 कोटींची परकीय गुंतवणूक आली. तिसऱ्या क्रमांकावरील दिल्लीत 10 हजार 788 कोटींची गुंतवणूक झाली. चौथ्या क्रमांकावरच्या तेलंगणात 9 हजार 23 कोटींची परकीय गुंतवणूक झाली. पाचव्या क्रमांकावर गुजरात असून त्यांची परकीय गुंतवणूक 8 हजार 508कोटी आहे. या सर्व राज्यांमध्ये झालेल्या परकीय गुंतवणुकीची बेरीज केली, तर त्यापेक्षाही जास्त गुंतवणूक फक्त महाराष्ट्रातच झाली आहे. देशात यावेळी आलेली परकीय गुंतवणूक एक लाख 34 हजार 959 कोटी रुपये असून त्यापैकी 52 टक्के रक्कम केवळ महाराष्ट्रात गुंतवण्यात आली आहे. 2022-2023 मध्ये महाराष्ट्रात एक लाख 18 हजार 422 कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक आली होती. ही गुंतवणूक त्यावेळच्या कर्नाटक, दिल्ली आणि गुजरातच्या एकत्रित गुंतवणुकीच्या बेरजेपेक्षाही जास्त होती. 2023-2024 मध्ये महाराष्ट्रात एक लाख 25 हजार 101 कोटीं यांच्या बेरजेहून अधिक आहे. एखाद्या राज्यात परकीय गुंतवणूक तेव्हाच येते जेव्हा तिथले वातावरण उद्योगाला अनुकूल असते. त्यांना स्वस्तात जमीन, वीज, पाणी उपलब्ध होते की नाही, हे पाहिले जाते. स्वस्त दरात मनुष्यबळ मिळते की नाही हे बघितले जाते. पायाभूत सुविधा आहेत की नाही ते पाहिले जाते. सामाजिक सलोखा राखला जातोय की नाही हे बघितले जाते.

फडणवीस मुख्यमंत्री असतानाच त्यांनी राज्यातल्या पायाभूत सुविधांवर भर दिला. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग उभारण्याचे काम त्याच काळात सुरु झाले. मुंबई-पनवेलपर्यंत जाणारा अटल सेतूची बांधणी तेव्हाच सुरु झाली. या महामार्गांना आसपासचे जिल्हे जोडण्याचे काम हाती घेण्यात आले. रस्त्यांचे, रेल्वेचे जाळे विकसित होत असेल, तर दळण-वळण सोपे होते, हे गुंतवणूक करणारेही जाणतात. गुंतवणुकीला आकर्षित करण्यासाठी त्यांनी तेव्हाच काही शॉर्टटर्म, तर काही लाँगटर्म योजना आखल्या. महाविकास आघाडीच्या काळात या योजनांना ब्रेक लागले; परंतु सत्तापालट झाला आणि पुन्हा या योजनांना गती आली व त्याचे परिणाम आता दिसत आहेत. फडणवीस मुख्यमंत्री असताना 2014 ते 2019 या काळात महाराष्ट्रात एकूण तीन लाख 62 हजार 161 कोटींची परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली होती. 2020 आणि 2021मध्ये महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार होते. त्या काळात महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत मागे पडला होता. या काळात गुजरात आणि कर्नाटक महाराष्ट्रापेक्षा पुढे गेले होते. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आल्यानंतर तेव्हाच फडणवीस यांनी जाहीर केले होते की पाच वर्षांतली गुंतवणूक आम्ही अडीच वर्षांत आणून दाखवू आणि सरकारची पावलेही त्याच दिशेने पडताना दिसत आहेत. दुसऱ्या तिमाहीतल्या परकीय गुंतवणुकीचा आकडा अजून जाहीर व्हायचा आहे. हा आकडा आल्यावर गुंतवणुकीची आकडेवारी आणखीनच वाढलेली दिसेल.



## शालेय कीक बॉक्सिंग स्पर्धा संपन्न

- या स्पर्धेत उरुळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालय येथील १७ वर्षे वयोगटातील इ.१० वी तील कु.राधिका हनुमंत यादव हिने सिल्वर मेडल मिळवले.

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा आधिकारी कार्यालय, पुणे किक बॉक्सिंग स्पोर्ट्स व मार्शल आर्ट्स असोसिएशन पुणे जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने 14 व 17 तसेच 19 वर्षे वयोगट मुला मुलींच्या पुणे जिल्हा स्तरीय शालेय कीक बॉक्सिंग या स्पर्धा डी.जी.बालगुडे हेल्थ क्लब घोरपडी पेठ पुणे 2 येथे पार पडल्या.

या स्पर्धेत उरुळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालय येथील 17 वर्षे वयोगटातील इ.10 वी तील कु.राधिका हनुमंत यादव हिने सिल्वर मेडल मिळवले. कु.कांदबरी संतोष कांचन हिने ब्रांझ मेडल तसेच कु.तुषार रामेश्वर राठोड ह्याने ब्रांझ पदक पटकावले. तसेच जिल्हा स्तरीय बॉक्सिंग स्पर्धा एम आय टी विश्वशांती गुरुकुल लोणी काळभोर येथे 17 वर्षे वयोगट यामध्ये महात्मा गांधी विद्यालयाच्या राष्ट्रीय खेळाडू चि.फैजान शकील शेख याने प्रथम क्रमांक पटकावत गोल्ड मेडल मिळवले.

त्याच्या या यशामुळे विभागीय स्तरावर खेळण्यासाठी निवड झाली. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी क्रमांक पटकावून जिल्हा व विभागीय स्तरावर निवड करून उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाचे नावलौकिकात भर पाडली आहे. खेळाडू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन क्रीडा शिक्षक संगीता शिर्के सह अन्य शिक्षकांचे लाभले. महात्मा गांधी सर्वोदय संघाचे सर्व अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, विश्वस्त, पदाधिकारी व विद्यालयाचे प्राचार्य भारत भोसले, प्रशासकीय वर्ग, अध्यापक - अध्यापिका शिक्षेकेतर कर्मचारी यांनी वरील विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## नव वर्षाची भव्यदिव्य सांगितिक भेट!

- १० जानेवारी २०२५ पासून रंगणार मनोरंजन आणि संगीताचा एक अद्भुद संगम
- सुबोध भावे दिग्दर्शित “संगीत मानापमान” चित्रपटातून वैदेही परशुरामी आणि सुमित राघवनचा लूक आऊट नवीन वर्षात सजणार
- मराठी परंपरेचा साज, मनामनात गुंजणार, सुरेल गीतांचा आवाज...!




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जिओ स्टुडिओज आणि सुबोध भावे यांचा बहुप्रतिक्षित संगीतमय चित्रपट "संगीत मानापमान" 10 जानेवारी 2025 ला प्रदर्शित होणार असल्याची बातमी आज विजयादशमीचे औचित्य साधून जिओ स्टुडिओज् ने दिली आहे. सोशल मीडियावर चित्रपटाचे पोस्टर रिलीज करण्यात आले असून सुबोध भावे बरोबर सुमित राघवन आणि वैदेही परशुरामी ही त्रयी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. सुबोध भावेंचा पहिला पोस्टर जेव्हा रिलीज झाला तेव्हाच या चित्रपटाची चर्चा सर्वत्र होऊ लागली होती. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली होती. वैदेहीचे नऊवारीतील विलोभनीय सौंदर्य आणि मराठमोळा साज तर राजबिंडा पारंपरिक पोशाख मधला सुमित राघवनचा लुक पाहता या चित्रपटाची भव्यता झळकून येत आहे. प्रेम, वीरता, शौर्य यांची गुंफण असलेले संगीत मानापमान नवीन वर्षात प्रेक्षकांसाठी एक मनोरंजनाची अविस्मरणीय भेट ठरणार आहे.

"चित्रपटा बद्दल बोलताना सुबोध भावे म्हणाले , "संगीत मानापमान या मराठीतल्या एका अत्यंत अभिजात अशा नाट्यकृती वरती काम करायला मिळणं हे खरोखर भाग्याची गोष्ट आहे.

बालगंधर्व चित्रपटात बालगंधर्वची भूमिका करत असताना मानापमान या नाटकाशी संबंध आला, पण कधी तरी आपण त्याच्यावरती सिनेमा करु असा वाटलं हि नव्हतं. पण मधल्या काळात कट्यार नंतर नवीन चित्रपटाची आखणी करताना सगळ्यात भावलं ते म्हणजे मानापमानची प्रेम कथा तसेच गोविंदराव टेंबेंसारख्या दिग्गज अशा संगीतकाराने संगीतबद्ध केलेली गाणी ज्याची इतक्या वर्षांनंतर ही गोडी तशीच आहे. बालगंधर्व असतील केशवराव भोसले असतील, दीनानाथ मंगेशकर असतील अशा दिग्गज नेत्यांचा स्पर्श, खडीलकरांची लेखनी असं एक वेग वेगळ्या अंगाने नटलेल्या नाटका वरती प्रेरित असा सिनेमा घडवताना तितक्याच तोलामोलाची मंडळी आजूबाजूला हवी होती. जिओ स्टुडिओज ची भक्कम साथ,कट्यार आणि काशिनाथच्या वेळेस जी माझ्यासोबत टेक्निकल टीम होती ती हि तितक्याच प्रमाणे माझ्या सोबत उभी राहिली. सुमित राघवन, वैदेही आणि बरेच कलावंत आहेत ज्यांची नावं लवकरच तुमच्यासमोर येतील त्यांचा माझ्यावरचा विश्वास. मला असा वाटतं कि हा सिनेमा फक्त सुबोध भावेचा नसून संपूर्ण संघाचा सिनेमा आहे.आणि नवीन वर्षाची आमच्या संगीत मानापमान टीम तर्फे सर्व रसिक प्रेक्षकांना हि संगीतमय प्रेम कथाभेट असणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिका सुबोध भावे करणार असून, ‘कट्यार काळजात घुसली‘ तसंच ‘आणि डॉ. काशिनाथ घाणेकर‘ या चित्रपटाची संपूर्ण तांत्रिक टीम ह्या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा एकत्र येत आहे त्याचबरोबर मुख्य म्हणजे प्रसिध्द संगीतकार शंकर -एहसान - लॉय यांचे संगीत या चित्रपटासाठी असणार आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत, निर्माती ज्योती देशपांडे निर्मित, श्री गणेश मार्केटिंग निर्मित, सुबोध भावे दिग्दर्शित आणि अभिनित, “संगीत मानापमान" ह्या संगीतमय चित्रपटात वैदेही परशुरामी, सुमित राघवन सोबत आणखी काही दिग्गज कलाकार असणार आहेत. हा सिनेमा नवीन वर्षात 10 जानेवारी 2025 रोजी महाराष्ट्रातील सर्व चित्रपटगृहात प्रदर्शनास सज्ज होणार आहे.

## थोडक्यात

### रूमाना अली यांची भाजपा सरचिटणीस पदी निवड



**पुणे (आरंभ पर्व) :** सामाजिक कार्यकर्त्या रूमाना अली यांची पुणे शहर भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्यक आघाडीच्या महिला सरचिटणीस पदी निवड करण्यात आली.भाजपचे पुणे शहर अल्पसंख्यक आघाडी प्रमुख इम्तियाज मोमीन यांच्या उपस्थितीत त्यांचे शनिवार, 19 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 4 वाजता कोंढवा येथे झालेल्या कार्यक्रमात पक्षात स्वागत करण्यात आले. सुफी पीर संप्रदायचे प्रतिनिधी खाजा इकबाल,मौलाना ईद्रीस कारी,सतपाल पारगे, इसाक पानसरे , तौफिक शेख, नितीन बोके, नुरजहा शेख, समीर पठाण उपस्थित होते. सिटी लॉन, पारगे नगर येथे हा कार्यक्रम शनिवार, 19 ऑक्टोबर रोजी सायंकाळी झाला. नागरिक अधिकार मंच च्या वतीने देखील त्यांचा सत्कार करण्यात आला.सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. ‘भाजपचे ध्येय धोरणाना अनुसरुन आगामी काळात कार्यरत राहणार असल्याचे रूमाना अली यांनी सांगितले.भाजपा सर्व तळागाळातील कार्यकर्त्यांना घेऊन सामाजिक प्रगती करीत आहे. भाजपावर सर्वांचा विश्वास वाढत आहे’,असे मनोगत इम्तियाज मोमीन यांनी व्यक्त केले.

### पिस्तूल बाळगणारा गजाआड, सिंहगड परिसरात कारवाई

**पुणे (आरंभ पर्व) :** पिस्तूल बाळगणाऱ्या सराईताला सिंहगड रस्ता पोलिसांनी हिंगणे परिसरातून अटक केली. त्याच्याबरोबर असलेल्या दोन अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून दोन पिस्तूल आणिचार जिवंत काडतूसे जप्त करण्यात आली आहेत. राज रवींद्र जागडे (वय 22, रा. वडगाव बुद्रूक, सिंहगड रस्ता) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. जागडे सराइत गुन्हेगार आहे. हिंगणे परिसरातील कॅनोल रस्त्यावर तिघे जण थांबले असून, त्यांच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. सहायक निरीक्षक सचिन निकम, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, स्वप्नील मगर, विनायक मोहीते, शिवाजी क्षीरसागर यांच्यासह पथकाने सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली. तेव्हा त्यांच्याकडे दोन पिस्तूल आणि चार काडतूसे जप्त करण्यात आली.

# आठव्या डेअरी व फिड एक्स्पोचे 24 ते 26 ऑक्टोबरदरम्यान आयोजन

## प्राची अरोरा व आनंद गोरड यांची पत्रकार परिषदेत माहिती; केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डेअरी, पोल्ट्री, मत्स्यपालन, पशुखाद्य व्यावसायिक आणि शेतकऱ्यांसाठी आयोजित आठवे आंतरराष्ट्रीय डेअरी व फिड प्रदर्शन दि. 24 ते 26 ऑक्टोबर 2024 या कालावधीत आटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटर, पिंपरी पुणे येथे होणार आहे. येत्या गुरुवारी (दि. 24) सकाळी 10.30 वाजता केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते या एक्स्पोचे उद्घाटन होणार आहे. गोकुळ दुध संघांचे चेअरमन अरुण डोंगळे, संचालक डॉ. चेतन नरके, चितळे बंधू मिठाईवालेचे इंद्रनील चितळे यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित रहाणार आहेत. सकाळी 10 ते संध्याकाळी 6 या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे. तेव्हा डेअरी व पशुखाद्य निर्मिती व्यावसायिकांनी, युवक, युवतींनी या संधीचा लाभ घेत प्रदर्शनाला भेट देऊन आपला व्यवसाय अत्याधुनिक व वृद्धिंगत करावा, अशी माहिती संयोजक, बेनिसन मीडियाच्या प्राची अरोरा व सहयोगी आनंद गोरड यांनी पत्रकार परिषदेत दिली.




प्रसंगी पोल्ट्री फेडरेशन ऑफ इंडियाचे पश्चिम विभागीय उपाध्यक्ष डॉ. सुजीत कुलकर्णी, जाफा फूडचे अमिया नाथ, गोकुळ दूधचे विक्री व पणन अधिकारी सुजय गुरव, चितळे बंधू मिठाईवाले येथील संशोधन अधिकारी डॉ. वैभवी पिंपळे आदी उपस्थित होते.

प्राची अरोरा म्हणाल्या, "प्रदर्शनाचे हे आठवे वर्ष असून, बेनिसन मीडियातर्फे याचे आयोजन केले जाते.

या डेअरी व फिड प्रदर्शनात अभ्यासपूर्ण सेमिनार्स, वर्कशॉप्स, चर्चासत्रांसह गोठा व्यवसाय, जनावरांचे आरोग्य व आहार व्यवस्थापन, क्लीन मिल्क प्रोडक्शन, लॅबोरेटरी सेटअप, लॅब तपासणीच्या पद्धती, डेअरी प्लांट मशीनरी, दूध प्रक्रिया व दुग्धजन्य पदार्थ निर्मितीचे आधुनिक तंत्रज्ञान, आईस्क्रीम व मिठाई उत्पादन, पॅकेजिंग व साठवणूक तंत्रज्ञान, डेअरी प्रॉडक्ट्स निर्यातीमधील संधी, डेअरी व्यवसाय व आयातनिर्यात, पशुखाद्य निर्मिती तंत्रज्ञान, मशीनरी सेट-अप, कच्च्या मालाची निवड व फॉर्मुलेशन, पोल्ट्री, मत्स्य व पशुखाद्य मार्केटची स्थिती अशा डेअरी व पशुखाद्य निर्मिती उद्योगासंबंधीच्या देशविदेशामधील सुमारे 100 कंपन्यांच्या मशिनरींची प्रात्यक्षिके पाहता येतील. तज्ञांसोबत थेट संवाद साधून या क्षेत्रातील अर्थकारण समजून घेता येईल. तसेच शासकीय योजना व कायदेशीर बाबीचीही माहिती दिली जाईल."

आनंद गोरड म्हणाले, "भारत हा कृषिप्रधान व दूध उत्पादनामध्ये जगात प्रथम क्रमांकाचा देश आहे. देशातील बहुतांश ग्रामीण अर्थकारण, तसेच काही भागातील उदरनिर्वाह दूध व्यवसायावरच अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांत दूध उत्पादन व त्याच्या गुणप्रतीमध्ये कमालीची सुधारणा झाल्याने विदेशातूनही दुग्धजन्य पदार्थांना मागणी वाढत आहे.

देशातील जनतेची क्रयशक्ती व आरोग्याप्रती पौष्टिक खाद्याविषयी जागृती वाढल्याने दुग्धजन्य पदार्थांचे सेवनही वाढले आहे. त्यातून व्यावसायिक संधी वाढल्या आहेत. ग्रामीण सुशिक्षित युवक, युवती दूध उत्पादनासोबतच स्वतःचे दुग्धजन्य पदार्थ निर्मिंत करून गावाजवळील बाजारपेठामध्ये, पर्यटन व धार्मिक स्थळामध्ये, एसटी स्टॅन्ड, रेल्वे स्टेशनसमोर स्वतःच्या ब्रँडच्या डेअरी उत्पादनांची विक्री केंद्रे सुरु करून ग्राहकांना व हॉटेल रेस्टोरंट, ढाबे यांना पुरवठा करण्याच्या व्यवसायाकडे मोठ्या प्रमाणात वळत असल्याचे दिसून येते."

"छोट्या-मोठ्या दूध उत्पादन, संकलन व प्रक्रिया करणारे प्रकल्पधारक, पोल्ट्री व मत्स्य पालन करणारे उद्योजक हे स्वतःचे छोटे किंवा मध्यम क्षमतेचे फिड उत्पादन युनिट सुरु करून अधिक नफा मिळवीत आहेत. गावी दूध संकलन करणारे उद्योजक दुग्धजन्य पदार्थांची वाहतूक, वितरण, विक्री यासारखे व्यवसाय करीत आहेत. यामुळेच अत्याधुनिक तंत्रज्ञान शिकून घेण्यासाठी, डेअरी व पशुखाद्य प्रदर्शनांना ग्रामीण युवकांचा मिळणारा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढतच असून प्रदर्शनांमधील प्रत्यक्षिके पाहून व विविध वर्कशॉप, सेमिनार्स, चर्चासत्रे यांमध्ये ग्रामीण युवक, युवती फार मोठ्या संख्येमध्ये सहभाग घेत आहेत. आपल्या प्रकल्पामधील शिल्लक उत्पादन क्षमतेच्या संधी मिळण्यासाठी, उत्पादित मालाला स्थानिक, राष्ट्रीय व तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठ कशी मिळवता येईल यासंबंधीची माहिती या प्रदर्शनांमध्ये देण्यात येणार आहे," असे आनंद गोरड यांनी नमूद केले.

## थोडक्यात





### ॲलन वॉकर लाइव्ह कॉन्सर्टमध्ये 36 मोबाईल चोरी

**पुणे (आरंभ पर्व) :** खराडीत ब्रिटिश गायक ॲलन वॉकर यांच्या संगीत रजनीमध्ये (लाइव्ह कॉन्सर्ट) गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी 36 जणांचे मोबाईल चोरून नेल्याची घटना घडली. दरम्यान, या प्रकरणी चंदननगर पोलिसांनी मुंबई आणि हैदराबादमधील चोरट्यांच्या टोळीतील चौघांना अटक केली. सय्यद महम्मद इद्रिस शेख (वय 21, रा. मुंबई), अखिल व्यंकटरमणा गोदावरी (वय 24, रा. हैदराबाद), लोकेश हनुमंत पुजारी (वय 31, रा. मुंबई) आणि पप्पू भागीरथी वैश्य (वय 24 रा. मुंबई) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. खराडीतील न्यू इंग्लिश फिनेक्स स्कूलच्या मैदानावर 18 ऑक्टोबर रोजी रात्री लाइव्ह कॉन्सर्टचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी चार लाख 87 हजार रुपये किमतीचे 36 मोबाईल चोरून नेले. याबाबत नागरिकांनी चंदननगर पोलिस ठाण्यात तक्रार केली. या प्रकरणाचा तपास करीत पोलिसांनी चार संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून 14 मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. आरोपींच्या इतर साथीदारांचा शोध घेण्यात येत आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय चव्हाण यांनी दिली.

### घराणेशाहीला 'जागा' नाही!

**पुणे (आरंभ पर्व) :** इतिहासाचा अभिमान आणि नव्याची जाण असलेले पुणेकर मतदार हे मतदानाबाबत नेहमी चोखंदळ राहिले आहेत. त्यामुळे कोणत्याही राजकीय पक्षाने उमेदवार लादला, तर पुणेकर त्याला योग्य 'जागा' दाखवितात. पुणेकरांच्या या सवयीचा धसका राजकीय पक्षांनी घेतला असल्याने पुण्यात घराणेशाहीला फारसा थारा नसल्याचे दिसते. आजवर झालेल्या लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांमध्ये काही अपवाद वगळता बहुतांश लोकप्रतिनिधी हे घराणेशाहीचा शिक्का नसलेले निवडून आलेले आहेत. महापालिका निवडणुकांमध्ये स्थानिक पातळीवर घराणेशाहीतून नगरसेवक निवडून येत असले, तरी त्यांना लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांमध्ये उभे करण्याचे धाडस राजकीय पक्षांनी केलेले दिसत नाही. आगामी विधानसभा निवडणुकीतही राजकीय वारशाऐवजी सामाजिक कार्याचा वसा पाहूनच उमेदवारी देण्यावर राजकीय पक्षांचा कल असणार आहे.पुण्यात जेमतेम 50 टक्केच मतदार मतदान करतात. त्याबाबत कायम टीका केली जाते. मात्र, हे 50 टक्के मतदार उमेदवार निवडताना कायम उमेदवार कोण आहे आणि त्याची कार्यक्षमता पाहून मतदान करत आले आहेत. त्यामुळे राजकीय पक्षांनी कोणताही उमेदवार आयात करून तो लादण्याचा प्रयत्न केला, तर पुणेकर मतदार त्यांना घरचा मार्ग दाखवितात. त्यामुळे राजकीय पक्ष हे पुण्यात उमेदवार देताना या सर्वांचा विचार करत आले आहेत. सध्या पुणे लोकसभा मतदारसंघातील सहा, तसेच खडकवासला आणि हडपसर या आठ विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतल्यास घराणेशाहीतून आलेले शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील सिद्धार्थ शिरोळे आणि हडपसरमधील चेतन तुपे हे दोनच आमदार निवडून आलेले दिसतात. हे घराणेशाहीतून आलेले उमेदवार असले, तरी ते लादलेले उमेदवार नसल्याची या मतदारसंघातील मतदारांची भावना असल्याने पहिल्याच निवडणुकीत ते निवडून आलेले दिसतात. शिरोळे यांचे वडील माजी खासदार अनिल शिरोळे यांची राजकारणातील स्वच्छ प्रतिमा सिद्धार्थ शिरोळे यांच्या पथ्यावर पडलेली दिसते. अनिल शिरोळे यांनी महापालिकेत नगरसेवक म्हणूनही उत्तम काम केलेले आहे. त्यामुळे शिवाजीनगरमधील मतदारांनी त्यांना स्वीकारले. चेतन तुपे यांचे वडील दिवंगत खासदार विठ्ठल तुपे यांचीही राजकारणातील प्रतिमा चांगली होती. त्यामुळे हडपसरमधील मतदारांनी गेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांना विजयी केले. पुण्याचे पहिले खासदार काकासाहेब गाडगीळ यांचा वारसा दिवंगत खासदार विठ्ठलराव गाडगीळ यांनी समर्थपणे चालविला. विठ्ठलराव गाडगीळ यांना राजकीय वारसा असला, तरी त्यांनी स्वकर्तृत्वाने पुण्यावर प्राबल्य राखले होते.



#### शिरूर हवेली मतदारसंघात आमदार

## अशोक पवार यांची प्रचारत आघाडी

### विरोधकांचा उमेदवार ठरेना

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

शिरूर हवेलीत मतदारसंघात राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार गट ) काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार अशोक पवार यांनी निवडणुकीपूर्वीच संपूर्ण मतदार संघ पिंजून काढला आहे.

राज्यात सर्वत्र विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असून प्रचाराचा धडाका लावत आमदार अशोक पवार यांनी आज तरी प्रचारात आघाडी घेतली आहे .तर दुसरीकडे

उमेदवारी ठरण्यात महायुतीचे घोडे अडले असले तरीही आयात उमेदवार नको तर आमच्यापैकीच एकाला संधी द्या असे इच्छुक उमेदवारांचे म्हणणे असल्याने महायुतीचा उमेदवार ठरवण्यात अनेक अडचणी येत आहे.त्यामुळे महायुतीत उमेदवारीबाबत घोळात घोळ असल्याचे दिसून येत आहे.

शिरूर विधानसभेची जागा महायुती मधून कोण लढवणार याबाबत अजूनही महायुतीत संभ्रम असल्याचे दिसून येत आहे.शिरूर विधानसभेची ही जागा भाजप अथवा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाकडून कोण लढवणार याबाबत अनेक उमेदवारांकडून दावे प्रतिदावे होत असल्याचे दिसून येत आहे.

शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघात गेल्या निवडणुकीच्या तुलनेत बराचसा बदल झाला आहे. या मतदारसंघांमध्ये चार लाख 60 हजारच्या आसपास मतदार आहे. त्यामुळे या मतदारांपर्यंत पोहोचणे दहा पंधरा वीस दिवसात शक्य नाही. तसेच निवडणुकीचे नियोजन करत संपूर्ण मतदारसंघात प्रचार करण्यासाठी कार्यकर्त्यांची मोठी कसरत होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचद्र पवार पक्षाचे विद्यमान आमदार अशोक पवार,त्यांचे कुटुंब नातेवाईक, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते ही निवडणूक जिंकण्यासाठी रात्रंदिवस मेहनत घेत आहे. निवडणूक जाहीर होण्याअगोदरच घरोघरी जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या असुन त्यांच्या प्रचाराची एक फेरी पूर्ण होऊन दुसरीही पूर्ण होण्याच्या तयारीत आहे. त्यात आमदार अशोक पवार यांनी शेकडो कोटीची कामे शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघांमध्ये मंजूर करून आणली आहेत.मतदारांच्या गाठीभाठी तसेच आमदार आपल्या गावी मुक्कामी या धर्तीवर अनेक गावांमध्ये एक दिवस मुक्काम करून त्यांनी प्रचाराला सुरवातही केली आहे. त्यांच्या प्रचाराचे नियोजन पाहता महायुती कडून अद्याप उमेदवारीचे घोंगडे अजूनही भिजत असल्याचे दिसून येत आहे.तर ठाकरे गटाचे माऊली कटके यांनी महाकाल यात्रेच्या निमित्ताने अनेक मतदारांशी संपर्क साधला असुन त्या निमित्ताने निवडणूक प्रचार चालू केला आहे .परंतु माऊली कटके हे अपक्ष लढणार का हातात घडयाळ बांधणार हे अजुनही गुलदस्त्यातच आहे .तर भाजप कडून प्रदिप कंद ,व जयश्री पलांडे या इच्छुक असुन भाजपचा उमेदवार अजुन घोषित झाला नाही . त्यामुळे आज तरी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विद्यमान आमदार अशोक पवार हे एकमेव उमेदवार विधानसभेच्या आखाड्यात उभे ठाकले असून त्यांच्या तोडीचा पहिलवान महायुती कधी देणार याकडे सगळ्यांचेच लक्ष लागून राहिले आहे.



## बारामतीतून अजित पवारच लढवणार निवडणूक!

**बारामती (दै. आरंभ पर्व)**

आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार हेच उमेदवार असतील. हे आज स्पष्ट झाले. बारामती शहरात अजित पवार यांच्या प्रचार यंत्रणेकडून त्यांच्या नावाच्या प्रचाराच्या गाड्या तयार करण्याचे काम वेगाने सुरू झाले आहे. या प्रचार रथावर विधानसभा निवडणुकीचे उमेदवार म्हणून अजित पवार यांच्या नावाचा उल्लेख असून निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या समोरील घड्याळाचे बटन दाबून अजित पवार यांना विजयी करा असा उल्लेख या वर करण्यात आला आहे.

त्यामुळे आता बारामतीतून राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा, शिवसेना व मित्र पक्षप्रणित महायुतीचे उमेदवार म्हणून अजित पवार हेच उमेदवार असतील, हे आता स्पष्ट झाले आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच 29 ऑक्टोबर रोजी अजित पवार बारामतीत आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

लोकसभा निवडणूकीनंतर मध्यंतरीच्या काळात अजित पवार यांनी बारामतीतून निवडणूक न लढविण्याचे अनेकदा संकेत दिले होते, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये कमालीची अस्वस्थता होती. बारामतीतच राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी अजित पवार यांचा ताफा अडवून तुम्हीच आम्हाला उमेदवार हवे आहात, अशा घोषणा दिल्यानंतर, तुमच्या मनात जे आहे तेच घडेल, असे अजित पवार यांनी जाहीर केले होते.

त्यानुसार आता स्वतः अजित पवार हेच बारामती विधानसभा मतदारसंघातून आठव्यांदा आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार हे आता स्पष्ट झाले आहे. सलग सात वेळा अजित पवार यांनी बारामती विधानसभेची निवडणूक जिंकलेली आहे.

## दोन विद्यार्थ्यांचा बंधाऱ्यात बुडून मृत्यू

**मुळशी (दै. आरंभ पर्व)**

खांबोली (ता. मुळशी) येथील बंधाऱ्यात बुडून पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. राज संभाजी पाटील ( वय 22 वर्षे , सध्या रा . आकुर्डी रेल्वे स्टेशन , पुणे . मूळ गाव .. म्हळसर , ता. शिंदखेडा , धुळे ) व ओजस आनंदा कटापुरकर ( वय. 22 . रा. शरयू नगर , प्राधिकरण , निगडी) असे मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांची नावे आहेत. दोघेही बी एस्सी द्वितीय वर्षात शिक्षण घेत होते. आज सकाळी सुमारे दहा ते साडे दहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सकाळी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असलेले एकूण नऊ विद्यार्थी खांबोली परिसरात फिरायला आले होते. येथील बंधाऱ्यातील पाणी आलेल्या शेताच्या बांधावरून ते चालत होते. या बांधालगत मोठा खड्डा होता.अंदाज न आल्याने या खड्ड्यात पाच जण घसरून पडले. त्यातील तीन जणांना




एकमेकांनी बाहेर काढले. मात्र दोघे जण पाण्यात बुडाले. त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. दोघांचेही मृतदेह अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढले असून शव विच्छेदन साठी पौड येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहेत मृत्यू झालेले दोघेही विद्यार्थी त्याच्या आई वडिलांना एकुलते एक होते. राज पाटील याचे मूळ गाव म्हळसर असून त्याचे आई वडील सध्या अमळनेर येथे राहतात. राज हा एकुलता एक असल्याने पाटील कुटुंबावर व नातेवाईकावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ओजस कटापुरकर हा सुद्धा त्याच्या आई वडिलांना एकुलता एक मुलगा होता. त्यामुळे त्याच्याही कुटुंब व नातेवाईकावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

*ॲमेझॉन एमएक्स् प्लेयरवरील प्लेग्राऊंड सीझन 4ची मेंटॉर म्हणून उर्फी जावेद झळकत असल्याने ग्लॅमर आणि*

## ड्रामा ॲक्शन तसेच अधिक मनोरंजानासाठी सज्ज व्हा

- **सादरकर्ता मोटोकॉर्प आणि सहसादरकर्ता टेक्नो असलेल्या प्लेग्राऊंडच्या चौथ्या सीझनचे विशेष स्ट्रीमिंग ॲमेझॉन एमएक्स् प्लेयरवर, मोबाइल, ॲमेझॉन शॉपिंग ॲप, प्राइम व्हीडिओ, फायर टीवही आणि कनेक्टेड टीव्हीच्या माध्यमातून त्यांच्या ॲपवर उपलब्ध**




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

ॲमेझॉनची विनामूल्य व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा, ॲमेझॉन एमएक्स प्लेयर प्लेग्राऊंड सीझन 4 मध्ये अतिरिक्त मार्गदर्शकाच्या भूमिकेत तडफदार उर्फी जावेदचे स्वागत करण्यासाठी रोमांचित आहे. धाडसी फॅशन विधाने आणि बेधडक सोशल मीडिया व्यक्तिमत्त्वासाठी प्रसिद्ध असलेल्या उर्फीचा प्रवेश कार्यक्रमाच्या पैलूंना हादरवून टाकण्यासाठी तयार आहे. ही नवीन आव्हाने स्पर्धकांना त्यांच्या कंफर्ट झोनच्या पलीकडे ढकलेल. मुनव्वर फारुकी, एल्विश यादव, मिथपाट आणि मॉर्टल या मार्गदर्शनाच्या दमदार टीमसोबत स्पर्धकांना आधीच तीव्र स्पर्धेचा सामना करावा लागत असल्याने, उर्फीचे आगमन आणखी सर्जनशीलता आणि उत्साहाचे वचन देते. ज्यामुळे स्पर्धेला एक उत्साहवर्धक वळण लागणार आहे. प्लेग्राऊंडच्या चौथ्या सीझनमधील निराळी उंची गाठणारी आव्हाने, प्रतिभावान स्पर्धकांच्या भावनिक नाट्याने आधीच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. या कार्यक्रमात उर्फीचा वावर नक्कीच स्पर्धेची तीव्रता अधिकच धारदार करेल. तपशीलावर करडी नजर आणि अस्सलतेवर भर देऊन, स्पर्धक उर्फीला प्रभावित करण्यासाठी स्वत:चा खेळ उंचावतील आणि स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यावर लक्षणीय भर देतील. बदलत्या ठोकताळ्यांनी नवीन स्पर्धा, नाट्य आणि करमणुकीला हवा दिली आहे. ज्यामुळे प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहोचल्याशिवाय राहणार नाही. आपल्या नवीन भूमिकेबद्दलचा उत्साह व्यक्त करताना उर्फी म्हणाली, "मार्गदर्शकाची भूमिका स्वीकारणे रोमांचक आहे! मी मागच्या वर्षी खेळाच्या प्लेग्राऊंडला भेट दिली होती. तिथली ऊर्जा, वातावरण काही औरच होते! उदयोन्मुख खेळाडूंना त्यांच्या प्रवासात मार्गदर्शन करण्यासाठी मी उत्सुक आहे. हा कार्यक्रम सर्जनशीलता, व्यक्तिमत्व आणि एकसंधतेला काटशह देणारा आहे. स्पर्धक त्यातून कसे बाहेर पडतात हे कधी एकदा पहाते असं झाले आहे. गेमप्ले आणि वैयक्तिक शैली या दोन्हीमध्ये त्यांना स्वतःला प्रामाणिकपणे व्यक्त करण्यासाठी आणि स्वतःशी प्रामाणिक राहण्यासाठी प्रेरित करणे हे माझे ध्येय आहे. लेट्स द गेम्स बिगिन!"

उर्फी जावेद प्लेग्राऊंडच्या चौथ्या सीझनमध्ये सहभागी होऊन अविस्मरणीय प्रवासाकरिता सज्ज असून तिची सिग्नेचर स्टाइल या कार्यक्रमाला मिळणार आहे. सादरकर्ता मोटोकॉर्प आणि सह-सादरकर्ता टेक्नो असलेल्या गेमिंग आणि एन्टरटेनमेंट फ्रेंचयझीचे खास स्ट्रीमिंग ॲमेझॉन एमएक्स् प्लेयरवर होणार असून मोबाइल, ॲमेझॉन शॉपिंग ॲप, प्राइम व्हीडिओ, फायर टीवही आणि कनेक्टेड टीव्हीच्या माध्यमातून त्यांच्या ॲपवर उपलब्ध होईल.

# एल ॲण्ड टी फायनान्स लिमिटेडचा (एलटीएफ) करोत्तर नफा (पॅट) 696 कोटी (एकत्रित) रूपयांवर, वार्षिक 17 टक्के वाढ

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

देशातील आघाडीच्या नॉन बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी (एनबीएफसी) एक असलेल्या एल ॲण्ड टी फायनान्स लिमिटेड (एलटीएफ) ने 30 सप्टेंबर 2024 ला संपलेल्या दुसऱ्या तिमाहीत 696 कोटी (एकत्रित) करोत्तर नफा नोंदविला आहे. त्यात वार्षिक आधारावर 17 टक्के वाढ झाली आहे. कंपनीचे एकूण कर्जवितरण अर्थात रिटेल बुक 28 टक्क्यांनी वाढून 88,975 कोटी रूपयांवर पोहचले आहे. कंपनीचे एकत्रित कर्ज वितरण वार्षिक आधारावर ( प्रतिवर्ष) 18 टक्क्यांनी वाढले आहे. 31 मार्च 2020 ला संपलेल्या पहिल्या तिमाहीपासूनची ही आत्तापर्यंतची उच्चांकी वाढ ठरली आहे. 30 सप्टेंबर 2024 ला संपलेल्या दुसऱ्या तिमाहीत कंपनीचे रिटेल कर्जवितरण 15,092 कोटी रूपयांवर झेपावले आहे. त्यात वार्षिक आधारावर 12 टक्क्यांनी वाढ झाली आहे. कंपनीचे ग्राहकाभिमुख प्लॅनेट ॲप हे ग्राहकांसाठी अतिशय सक्षम असे डिजीटल माध्यम ठरले आहे. आत्तापर्यंत या ॲपच्या डाऊनलोडचा एकूण आकडा 1.25 कोटीवर पोहचला आहे. ग्रामीण भागातून 13.5 लाखांपेक्षा अधिक डाऊनलोडचा यात समावेश आहे. या माध्यमातून आत्तापर्यंत 2,400 कोटी रूपयांचे संकलन झाले आहे, तर 8,600 कोटी रूपयांचे कर्ज त्यातून घेतले गेले आहे. (वेबसह) कंपनीच्या वित्तीय कामगिरीबाबत बोलताना एलटीएफचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ श्री. सुदिप्ता रॉय म्हणाले, "पोर्टफोलिओचे सक्रीय व्यवस्थापन आणि संकलनासाठी सातत्याने राबविलेल्या धोरणांमुळे आमच्या कंपनीला सातत्यपुर्ण कामगिरी आणि नफा नोंदविता आला आहे. ढोबळ पातळीवर अस्थिर वातावरण आणि क्षेत्रासाठी बहुविध अडथळ्यांमुळे चालू वित्त वर्षाची ही दुसरी तिमाही खूपच आव्हानात्मक ठरली. आगामी कालावधीचा आढावा घेता, पुढील दोन तिमाहींसाठी क्षेत्रनिहाय आव्हाने कायम राहण्याची शक्यता आहे. या शक्यतांची दखल घेत आगामी तिमाहीसाठी आम्ही आमच्या व्यावसायिक उद्दीष्टांची लवचिकपणे फेररचना करू शकतो आणि त्यासाठी व्यवस्थापनांतर्गत असलेल्या मालमत्तेत वाढ कायम राखण्याकरिता सकारात्मक अशा कर्जाला प्राधान्य देऊ शकतो.

L&T Finance

### रूरल बिझनेस फायनांस

- क्षेत्रीय अडथळे असूनही जोखीमनुरूप दृष्टिकोनासह एकूण कर्जवितरण 5,741 कोटी रुपयांच्या तुलनेत 5,435 कोटी रुपये असून त्यात वार्षिक आधारावर 5 टक्के घट झाली आहे.
- एकूण कर्जवितरण 21,672 कोटी रुपयांच्या तुलनेत 26,539 कोटी रुपयांवर झेपावले असून त्यात वार्षिक आधारावर 22 टक्के वाढ झाली आहे.
- कार्यक्षम सोर्सिंग आणि पोर्टफोलिओ देखरेख प्रणालीसह एकत्रित कर्ज संकलन प्रयत्नांमुळे तिमाहीसाठी 99.45 टक्क्यांची उत्कृष्ट संग्रह कार्यक्षमता राखण्यात यश

फार्मर फायनांस:

- एकूण कर्ज वितरण 1,534 कोटी रुपयांच्या तुलनेत 1,782 कोटी रुपयांवर पोहचले असून त्यात वार्षिक 16 टक्के वाढ
- एकूण कर्ज पुरवठा (बुक साईझ) 13,351 कोटी रुपयांच्या तुलनेत 14,488 कोटी रुपयांवर पोहचले असून त्यात वार्षिक 9 टक्के वाढ
- दमदार मान्सून, खरीप पीक आणि जलाशयांत स्थिर पाणीपातळी यामुळे वाढीस मदत झाली

टू व्हीलर फायनांस:

- कर्जवितरण 1,817 कोटी रुपयांच्या तुलनेत 2,393 कोटी रुपयांवर झेपावले असून त्यात वार्षिक 32 टक्के वाढ

कर्जवितरणासाठी आम्ही तयार केलेला प्रोजेक्ट सायक्लॉप्स हा उपक्रम 30 सप्टेंबर 2024 च्या दुसऱ्या तिमाहीत दुचाकी वित्तपुरवठ्यासाठी कार्यान्वित झाला आहे. हा उपक्रम यंदाच्या वित्तीय वर्षातील उर्वरित कालावधीसाठी आमच्या अन्य वित्तपुरवठा पर्यायांसाठी सुरु केला जाणार आहे. आर्थिक सेवा अर्थप्रणालीत हा उपक्रम धोरणात्मक वेगळेपण असेल, अशी आमची अपेक्षा आहे. उच्च कर्ज गुणवत्ता राखताना कमी खर्चिक संपादन सुनिश्चित करण्यासाठी डिजिटल सक्षम इंजिनाचे संपादन बड्या तांत्रिक भागीदारीद्वारे साध्य केले जाणार आहे.

आम्ही आमच्या आगामी वाटचालीच्या रणनीतीबद्दल आशावादी आहोत. अनेक क्षेत्रीय आव्हाने असूनही, आम्ही आमच्या एकूण परिवर्तनाच्या मसुद्यावर लक्ष केंद्रित करत आहोत आणि त्याच दिशेने बारकाईने आमच्याकडून सतत अंमलबजावणी सुरु आहे."

## थोडक्यात



### विमानात बॉम्ब ठेवल्याची अफवा; एकाविरुद्ध गुन्हा

**पुणे (आरंभ पर्व) :** विमानात बॉम्ब ठेवल्याची अफवा पसरविल्याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. समाजमाध्यमातून रविवारी पाठविण्यात आलेल्या संदेशामुळे प्रवाशांमध्ये घबराट उडाली. विमानतळ प्रशासन, तसेच बॉम्ब शोधक पथकाने तपासणी केल्यानंतर विमानात बॉम्बसदृश वस्तू आढळून आली नाही. याप्रकरणी समाजमाध्यमातील खाते वापरकर्ता (स्क्रिझोफ्रेनिया 111) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विमानतळ प्रशासनाकडून मुनीष कोतवाल (वय 43) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पुणे आंतराष्ट्रीय विमानतळावरून रविवारी (20 ऑक्टोबर) दुपारी सिंगापूरला निघालेल्या एका खासगी विमान कंपनीच्या विमानात बॉम्ब ठेवल्याचा संदेश समाजमाध्यमातील खात्यावरून पाठविण्यात आला. संबंधित संदेश विमानतळ प्रशासनाने पाहिला. त्यानंतर तातडीने या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात दिली. पोलिसांचे बॉम्ब शोधक नाशक पथक आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानांनी विमानतळाची तपासणी केली. तेव्हा विमानात बॉम्बसदृश वस्तू आढळून आली नाही.

# रवींद्र धंगेकर यांच्या हिंदमाता प्रतिष्ठानविरुद्ध गुन्हा

## दिवाळीनिमित्त नागरिकांना साबण, उटणे वाटप

**पुणे (दै. आरंभ पर्व)** कसब्यातील काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांच्या हिंदमाता प्रतिष्ठानकडून दिवाळीनिमित्त साबण, उटणे वाटप करण्यात आल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली. त्यानंतर रविवारी रात्री उशीरा धंगेकर यांच्या हिंदमाता प्रतिष्ठानविरुद्ध आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांनी समर्थ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. हिंदमाता प्रतिष्ठानकडून दिवाळीनिमित्त कसबा मतदारसंघातील नागरिकांनी दिवाळीनिमित्त सुगंधी, उटणे, उदबत्ती, रांगोळी अशा वस्तू असलेल्या पिशव्यांचे वाटप करण्यात आले. पिशवीवर धंगेकर यांच्यासह त्यांच्या पत्नीचे छायाचित्रे असून, मतदारांना प्रलोभन दाखविण्यात आल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली. त्यानंतर रविवारी रात्री निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांनी समर्थ पोलीस ठाण्यात तक्रार दिली.



दरवर्षी माझा मित्र परिवारआनंदाची दिवाळी भेट देतो. नागरिकांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी हा उपक्रम राबविला जातो. आचारसंहिता लागू केल्यानंतर कुठल्याही प्रकारचे प्रलोभन किंवा वस्तुंचे वाटप करण्यावर बंधन आहे, याची जाणीव मला आहे. या उपक्रमात माझा व्यक्तिश सहभाग नाही. मला अजून उमेदवारी जाहीर झाले नाही. माझा कसब्यातून विजय पक्का असल्याने विरोधकांच्या मनात धडकी भरली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे छायाचित्र असलेल्या पिशव्यांतून नागिरकांना दिवाळीनिमित्त वस्तूंचे वाटप सुरु आहे. माझा मित्र परिवार नागरिकांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करतो. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे छायाचित्र असलेल्या पिशव्यांचे वाटप कोण रोखणार, असा प्रश्न धंगेकर यांनी उपस्थित केला आहे. माझ्यावर जर गुन्हा दाखल होऊ शकतो, तर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी धंगेकर यांनी केली आहे.

## 'बोपदेव घाट' प्रकरणातील पीडित तरुणीला पाच लाखांची नुकसान भरपाई, विधी सेवा प्राधिकरणाकडून 'मनोधैर्य योजने'अंतर्गत मदत

**पुणे (दै. आरंभ पर्व)** बोपदेव घाट सामूहिक बलात्कार प्रकरणातील पीडित तरुणीला विधी सेवा प्राधिकरणाकडून 'मनोधैर्य' योजने अंतर्गत पाच लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. विधी सेवा प्राधिकरणाकडून याबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

विधी सेवा प्राधिकरणाच्या 'मनोधैर्य' योजनेअंतर्गत अत्याचार प्रकरणातील पीडितांना मदत करण्यात येते. बोपदेव घाटात 3 ऑक्टोबर रोजी मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीला कोयत्याचा धाक दाखवून तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याबरोबर असलेल्या साथीदाराचा शोध घेण्यात येत आहे. 'मनोधैर्य' योजने अंतर्गत नुकसान भरपाई मिळवण्यासाठी पीडित तरुणीने



विधी सेवा प्राधिकरणाकडे अर्ज केला होता. अर्ज आल्यानंतर नऊ दिवसांत संबंधित अर्ज मंजूर करून पीडित तरुणीला दिलासा देण्यात आला.

नुकसान भरपाईपोटी मिळणारी 25 टक्के रक्कम तरुणीला रोख स्वरुपात देण्यात येणार आहे. उर्वरित 75 टक्के रक्कम दहा वर्षांसाठी पीडित तरुणींच्या नावे बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येणार आहे. या रकमेतून मिळणाऱ्या व्याजातून ती उपचार घेऊ शकते, तसेच दैनंदिन खर्च भागविण्यासाठी मदत होणार आहे.

पीडित बालक किंवा महिलेचे पुनर्वसन करण्यासाठी 'मनोधैर्य' योजना सुरु करण्यात आली आहे. विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून या योजनेची अंमलबजावणी होत असते. पीडित महिलेला कमीत कमी 30 हजार रुपयांपासून जास्तीत जास्त दहा लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळते. पीडित महिलांना आधार आणि धैर्य देण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनानुसार त्वरित अर्ज निकाली काढण्यात आला. पीडित तरुणीने 11 ऑक्टोबर रोजी नुकसान भरपाई मिळवण्यासाठी अर्ज केला होता. तो 19 ऑक्टोबर रोजी निकाली काढण्यात आला, असे पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी नमूद केले.

